वृत्तपत्र बातमी –

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे त्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेश अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेबाबत.....

कोल्हापूर - सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिकविल्या जाणा-या M.Sc. अभ्यासक्रम व विद्यापीठ अधिविभागातील ज्या अभ्यासक्रमांच्यां प्रवेशाकरीता प्रवेश परीक्षा आहेत अशा अभ्यासक्रमांच्या **भाग १ प्रवेश परीक्षेसाठी यापूर्वी दि. २७/०४/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज मागणी करण्यात आले होते. यास विद्यार्थी हितास्तव प्रवेश अर्ज करण्यासाठी दि.०३/०५/२०२६ अखेर मुदतवाढ देण्यात आली आहे** तसेच ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाहीत अशा अभ्याक्रमांकरीता प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि.३१/०५/२०२६ अखेर आहे.

विद्यार्थ्यांनी सविस्तर तपशीलासाठी https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information या संकेतस्थळाला भेट द्यावी. प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, याचीही विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव